THREE DAYS TRAINING ON
**"INDUCTION PROGRAM FOR SUPPORTING STAFF"**
UNDER
**TECHNICAL EDUCATION QUALITY IMPROVEMENT PROGRAMME (TEQIP PHASE III)**

**(20TH - 22ND MARCH, 2018)**
ORGANIZED BY
**SARDAR PATEL COLLEGE OF ENGINEERING**
(GOVERNMENT AIDED AUTONOMOUS INSTITUTE PERMANENTLY AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI)
ANDHERI, (WEST), MUMBAI – 400 058.

सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने सदर तिन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक २० मार्च २०१८ ते २२ मार्च २०१८ या कालावधीत करण्यात आले. प्रारंभी दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला संस्थेचे प्राचार्य डॉ. पी.एच. सावंत, उपप्राचार्य डॉ. एम.एम. मुरुडी, टेक्युप समन्वयक डॉ. श्रीमती अनुपा सबनीस, कार्यक्रमाचे दोन्ही समन्वयक श्रीमती वि.पी. जोशी व डॉ. सुधाकर उमाळे, यांनी सर्व सहभागी प्रशिक्षणार्थीना संबोधित केले.

या प्रशिक्षणासाठी **श्री. अनिल वोरा व त्यांच्या टीमला** आमंत्रित करण्यात आले. संस्थेच्या वतीने दिलेल्या सदर आमंत्रणाचा मान राखून **श्री. अनिल वोरा, डॉ. छोटालाल शहा, श्री. मंगेश शास्त्री, श्री. प्रशांत जैन, श्री. अतुल मिटकर, कु. विजयंका शहा** या संपूर्ण टीमने महाविद्यालयातील या प्रशिक्षणासाठी सहभागी झालेल्या सर्व १८ प्रशिक्षणार्थीना सलग तीन दिवस संबोधित केले.

त्यांनी सर्व सहभागी प्रशिक्षणार्थीना चेतना विकास मूल्या बाबत मार्गदर्शन केले. त्यांची किमया अशी होती की आपला प्रत्येक दिवस हा होळी प्रमाणे व आपली प्रत्येक रात्र ही दिपावली प्रमाणे आनंदी असावी, असे सांगून उत्सव पूर्वक कसे जगता येईल हे पटवून दिले. आपल्या जीवनाचे सार काय आहे, याविषयी विस्तृत चर्चा करुन माणूस कसा असावा ? कसं जगावं ? जिवनाचा अर्थ काय ?, सुख म्हणजे काय ? निसर्गासोबत कसे राहता येईल ?, याचे ज्ञान /महत्व पुढील पिढी ला कसे देता येईल ? या विषयी चर्चा केली. तसेच भौतिक सुखाच्या मागे न लागता भावनात्मक सुखाची कास कशी धरता येईल. मानवाला सुख कसे प्राप्त होईल ? याची माहिती दिली.

मानवाच्या चार अवस्था, मानवाचे परस्परांशी संबंध, एकमेकांशी ताळमेळ नसणे म्हणजेच अव्यवस्था ही समस्या आहे., एखादी गोष्ट मानणे व त्या गोष्टीला जाणणे, निरंतर सुखाची प्राप्ती कशी करता येईल? सुखाची परिभाषा काय? अखंड समाज व्यवस्था याबाबत मार्गदर्शन केले.

सरते शेवटी सदर प्रशिक्षणात सहभागी प्रशिक्षणार्थीकडून (सर्व दादा आणि ताईं कडून) FEEDBACK FORM त्यांचे अभिप्राय भरुन घेण्यात आले. बहुतेक सर्वाच्या मते प्रशिक्षण हे उत्कृष्ट होते. प्रशिक्षणामध्ये ठळक विषयांचा आढावा घेतला गेला. प्रशिक्षकांची सांगण्याची पध्दत सोपी होती. अशाच प्रकारचे प्रशिक्षण पुन: व्हावेत अशी सर्वांची इच्छा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते सर्वाना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमासाठी श्री. लुईस डायस यांनी अभ्यासक्रम समन्वयक व श्री. संदीप तळेकर यांनी अभ्यासक्रमाचे आयोजक म्हणून काम पाहीले.